# उल्हासनगर महानगरपालिका

## पर्यावरण विभाग

जा.क्र.उमपा/पर्यावरण/४५ / 2022

दिनांक- १० / १० / 2022

# जाहीर आवाहन

उल्हासनगर शहर हद्दीतील सर्व फटाके विक्री करणारे व्यवसायिक व फटाके वापर करणारे नागरीक यांना आवाहन करण्यात येते की, भारत सरकार , अधिसुचना क्रमांक G.S.R. 682 (E) dt.05/10/1999 अन्वये 125 dB (A) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणा-या फटाक्यांचे उत्पादन , विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार बेरियम सॉल्ट , लिथीयम , अर्सेनिक , लीड, मर्क्युरी . यासारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे. या घटकामुळे विषारी वायु तयार होतात हे वायु प्राणी व वनस्पती या दोघांना घातक आहेत . तसेच जनहित याचिका क्र. 152/2015 मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाका विक्रेत्यांनी विस्फोटक व अधिनियम 1884 आणि त्या अंतर्गत केलेले विस्फोटक नियम 2008 मधील प्रतिबंध व नियम यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे . तरी फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटाके विक्री करावयाची नाही. तसेच परवानगी असलेले फटाके महापालिकेने निश्चीत केलेल्या ठिकाणी परवानगी घेऊनच विक्री करावयाची आहे.

महाराष्ट्र शासनाचे माझी वसुंधरा अभियान 3.0 आणि स्वच्छ सर्वेक्षण 2023 अभियानातंर्गत फटाकेमुक्त , प्लास्टिकमुक्त , कचरामुक्त, प्रदुषणमुक्त व पर्यावरणपुरक (ग्रीन फेस्टिवल) सण-उत्सव साजरे करावेत , सदर अभियानांतर्गत नागरिकांनी फटाक्यांचा वापर टाळावा, प्लास्टिकचा वापर टाळुन कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करावा , सण समारंभामध्ये टाकाऊ वस्तुंचा व पुनर्वापर करण्यायोग्य वस्तुंचा वापर जास्तीतजास्त करावा, पर्यावरणपूरक ,प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करावी .

तरी येणारी दिवाळी हरित व पर्यावरणपूरक दिवाळी म्हणून साजरी करुया. तसेच ही दिवाळी आनंदी व सुरक्षित राहो, अशा सर्वाना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा.

(अजिज शेख)
प्रशासक तथा आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका